महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

मुअ/वा/लेखा/वि.शु.-७/ No 2 6 3 9 1 दिनांक : 2 1 AUG 2010

परिपत्रक क्र. १२९

**विषय :- विद्युत शुल्क व विज विक्री कराची विवरणपत्र विहित मुदतीत सादर करण्याबाबत.**

संदर्भ :- मुख्य अभियंता (विद्युत) यांचे पत्र क्र. मुअ(वि)/का-५/३/२०२९/सन २०१० दि. १३.७.२०१०.

मुंबई विद्युत शुल्क व वीज विक्री कराच्या अधिनियमानुसार प्रत्येक परवानाधारकाने ग्राहकाकडून वसुल केलेली विद्युत शुल्क व वीज विक्री कराची रक्कम नियमाप्रमाणे शासन कोषागरात विहीत मुदतीत जमा करण्याची तरतूद आहे. तद्वत विद्युत शुल्क व वीज विक्री कराची विवरणपत्रे शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. तथापि मुख्य अभियंता (विद्युत) यांचे संदर्भाधीन पत्रान्वये असे निर्देशित केले आहे की, विद्युत निरीक्षकांनी कळविलेली रक्कम व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने कळविलेली रक्कम याचा मेळ घालणे शक्य होईल.

मुख्य अभियंता (विद्युत) व विद्युत निरिक्षक यांचे कार्यालयास काही बिलींग सेंटर्स विद्युत शुल्क व वीज विक्री कराची विवरणपत्रे नियमित पाठवित नाहीत. सदर विवरणपत्रे नियमितपणे न मिळाल्यामुळे विद्युत शुल्क व विज विक्री कराच्या वसुलीच्या रकमेबाबत एकूण वर्गनिहाय युनीट व रक्कम अचुकपणे शासनास सादर करणे शक्य होत नाही. त्यामुळे विद्युत शुल्क व विज विक्री कराची माहेवार प्रत्यक्ष किती रक्कम जमा झाली व किती जमा होणार आहे याचा अंदाज करता येत नाही व शासनास महसुल जमा संबंधित वेळोवेळी आढावा घेणे शक्य होत नाही. शासनाकडून प्रत्येक महिन्यात महसुल जमा संबंधित आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**अ- विद्युत शुल्क**

मुंबई विद्युत शुल्क नियमावली १९६२ मधील नियम क्र. ९ अन्वये शासनाने त्रैमासिक 'क' विवरणपत्रे सादर करण्याचा कालावधी खालीलप्रमाणे विहित केलेला आहे. तसेच 'क' विवरणपत्रास 'इ' विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे 'इ' विवरणपत्र निरंक असले तरी सोबत जोडण्यात यावे.

| अ.क्र. | त्रैमासिक 'क' विवरणपत्राचा कालावधी | त्रैमासिक'क' विवरणपत्र सादर करावयाचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | जून | संबंधित वर्षातील २५ ऑगस्ट पुर्वी |
| २ | सप्टेंबर | संबंधित वर्षातील २५ नोव्हेंबर पुर्वी |
| ३ | डिसेंबर | संबंधित वर्षातील २५ फेब्रुवारी पुर्वी |
| ४ | मार्च | संबंधित वर्षातील २५ मे पुर्वी |

वरील त्रैमासिक 'क' विवरणपत्र विहित कालावधीत सादर न केल्यास मुंबई विद्युत शुल्क १९५८ मधील नियम-९ अन्वये दंडनिय रक्कम रु. १०००/- प्रत्येक त्रैमासिकांस आकारण्याची तरतूद आहे व उक्त अधिनियमातील नियम क्र. १० (१) अन्वये ज्यावेळी जो व्यक्ती कार्यालय प्रमुख होती व आहे अशा संबंधित व्यक्तीने सदर आकारण्यात आलेली दंडनिय रक्कम अदा करण्याबाबतही तरतूद आहे.

ब- विज विक्रीकर

महाराष्ट्र विज विक्री कर नियमावली १९६४ मधील नियम क्रमांक ४ (सी) व (डी) मधील तरतुदीनुसार वीज विक्री कराचे त्रैमासिक 'अ' विवरणपत्र सादर करावयाचा कालावधी व 'ब' विवरणपत्र सादर करावयाचा कालावधी शासनाने खालीलप्रमाणे विहित केलेला आहे.

**त्रैमासिक 'अ' विवरणपत्र सादर करावयाचा कालावधी**

| अ.क्र. | त्रैमासिक कालावधी | त्रैमासिक 'अ' विवरणपत्र सादर करावयाचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | मार्च | संबंधित वर्षातील १० मे पुर्वी |
| २ | जून | संबंधित वर्षातील १० ऑगस्ट पुर्वी |
| ३ | सप्टेंबर | संबंधित वर्षातील १० नोव्हेंबर पुर्वी |
| ४ | डिसेंबर | संबंधित वर्षातील १० फेब्रुवारी पुर्वी |

**वार्षिक ब विवरणपत्र सादर करण्याचा कालावधी**

| अ.क्र. | वार्षिक 'ब' विवरणपत्र कालावधी | सादर करावयाचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | जानेवारी ते डिसेंबर | संबंधित वर्षातील १० फेब्रुवारी पूर्वी |

महाराष्ट्र वीज विक्रीकर अधिनियम १९६३ मधील नियम क्रमांक ११ अन्वये शासनाने विहित केलेल्या वरील कालावधीत त्रैमासिक 'अ' व 'ब' वार्षिक विवरणपत्र विहीत मुदतीत सादर न केल्यास प्रत्येक त्रैमासिक / वार्षिक विवरणपत्रासाठी रु. १०००/- प्रमाणे दंडनिय रक्कम आकारावयाची तरतुद आहे व उक्त अधिनियमातील नियम क्रमाक १२ (१) अन्वये जी व्यक्ती ज्यावेळी कार्यालय प्रमुख होती व आहे अशा संबंधित व्यक्तीने दंडनिय रक्कम अदा करण्याबाबतही तरतुद आहे.

आपल्या अखत्यारीतील मंडळ कार्यालये 'क' विवरणपत्र वेळेवर सादर करीत नाहीत. सबब विद्युत निरिक्षकांना 'क' अहवालानुसार विद्युत कर वसुल झाल्याचा ताळमेळ घेता येत नाही. याबाबत महालेखाकार कार्यालयातून आक्षेप घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत मार्च २०१० अखेरचे त्रैमासिक विवरणपत्र मंडळ कार्यालयातून विद्युत निरीक्षकांना अद्याप प्राप्त झाले नसल्यामुळे सन २००९-१० चा ताळमेळ घेता येत नाही. आपल्या स्तरावरुन सर्व मंडळ कार्यालयास 'क' विवरणपत्र त्वरीत विद्युत निरीक्षक कार्यालयास सादर करणेविषयी सूचना द्याव्यात.

सर्व मुख्य अभियंता, यांना विनंती करण्यात येत आहे की, आपल्या अधिपत्याखालील सर्व बिलींग सेंटर्सना वर्गनिहाय युनीट व त्याचप्रमाणे होणारे विद्युत शुल्क व वीज विक्री कराची माहिती दर महिन्याच्या विहित तारखेतच विद्युत निरीक्षक यांचेकडे सादर करतील, असे पहावे म्हणजे शासनास विद्युत शुल्क व वीज विक्री कराच्या महसुल संबंधी दर महिन्यास आढावा घेणे शक्य होईल.

नरेंद्र सिंह

मुख्य अभियंता (वाणिज्य)

**प्रत सस्नेह रवाना :-**

मुख्य अभियंता, महावितरण, सर्व सं. व सु. परिमंडळ कार्यालये.

**प्रत रवाना :-**

१) अधीक्षक अभियंता, महावितरण, सर्व सं. व सु. मंडळ कार्यालये.

२) कार्यकारी अभियंता, महावितरण, सर्व सं. व सु. विभागीय कार्यालये.

D:\Vaze\Accts\circular ED.doc